**<u>ठळक बातम्या</u>**

- आत्मनिर्भरतेवर भर देतानाच अनावश्यक परदेश दौरे आणि सोने खरेदी टाळण्याचं प्रधानमंत्र्यांचं देशवासियांना पुन्हा एकदा आवाहन

- साखरेच्या साठ्यावरचे निर्बंध केंद्र सरकारने वाढवले

- अमली पदार्थांचं समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्याचं सर्वसमावेशक धोरण जाहीर

- ऑगस्ट महिन्यात वस्तू आणि सेवा कराच्या सकल संकलनात १४ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांची वाढ

**आणि**

- सिंधुदुर्ग किल्ल्याजवळ मासेमारी नौका उलटून दोघांचा मृत्यू

**<><><><><>**

देशाचा आर्थिकवृद्धी दर कायम ठेवायचा असेल तर आत्मनिर्भरतेवर भर द्यायला हवा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमांवरुन केलं आहे. स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेवर अधिकाधिक भर दिला तर विकसित भारताचं स्वप्न २०४७ पर्यंत साध्य होऊ शकेल असं ते म्हणाले. जगभर अस्थिर वातावरण असताना भारतानं ७ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांचा विकास दर साध्य केल्याबद्दल त्यांनी देशवासियांचं अभिनंदन केलं आणि परदेश दौरे टाळणे, सोने खरेदी टाळण्याचं आवाहन पुन्हा एकदा केलं.

**प्रधानमंत्री बाइट**

**<><><><><>**

दहशतवाद हा काही विशिष्ट देशांच्या सुरक्षेला असलेला धोका नसून संपूर्ण मानवजाती समोरचं आव्हान असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. बिश्केक इथे शांघाय सहकार्य संघटनेच्या राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेला ते संबोधित करत होते. कोणताही देश, समाज किंवा नागरिक स्वतःला दहशतवादाच्या धोक्यापासून अलिप्त समजू शकत नाही, असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

सन २०२९पर्यंत राज्यातून अमली पदार्थांचं समूळ उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाचं सर्वसमावेशक शासकीय दृष्टिकोन धोरण आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत जाहीर करण्यात आलं. याशिवाय, पुणे जिल्ह्यातल्या कुकडी पाटबंधारे प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या सुधारित खर्चाला मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. यातून जवळपास १ लाख ४५ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. सोलापूर शहरातल्या जुना पुणे नाका ते बोरामणी नाका यादरम्यानचा उन्नत मार्ग निकडीचा सार्वजनिक प्रकल्प म्हणून मंत्रिमंडळानं जाहीर केला. यामुळे हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक शासकीय जमीन, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसंच शासकीय-निमशासकीय बैठका, कार्यक्रमांदरम्यान आणि उपहारगृहांमध्ये आरोग्यदायी अन्नपदार्थ ठेवण्याच्या धोरणालाही मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली. याअंतर्गत संतुलित अन्नपदार्थ ठेवणं बंधनकारक होणार आहे.

**<><><><><>**

साखरेच्या घाऊक व्यापारांना १५ तारखेपासून जास्तीत जास्त २ हजार क्विंटल साखरेचा साठा करता येणार आहे. पुरेशा प्रमाणात साखरेची उपलब्धता, साठेबाजी टाळणे आणि किंमती मर्यादित ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं आज या निर्बंधांची घोषणा केली. सध्या ही मर्यादा ४ हजार क्विंटल आहे. १५ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत ही नवी मर्यादा लागू असेल. गेल्या काही दिवसात केलेल्या विविध उपाय योजनांमुळं साखर कारखान्यांमधल्या साखरेची किंमत २० टक्क्यांनी कमी झाल्याचं सरकारनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आगामी गणेशोत्सवासाठी मध्य रेल्वेने जाहीर केलेल्या २०० अतिरिक्त विशेष गाड्यांसाठी आतापर्यंत १ लाख १७ हजारांपेक्षा जास्त प्रवाशांनी आरक्षण केलं असल्याचं मध्य रेल्वेनं कळवलं आहे. गणेशोत्सवानिमीत्त यंदा रेल्वेनं २६२ जादा गाड्यांचं नियोजन केलं आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरांतून कोकण आणि गोव्यातल्या विविध ठिकाणांपर्यंत या गाड्या चालवल्या जाणार असल्याचं रेल्वेच्या पत्रकात म्हटलं आहे. या काळात प्रवाशांच्या सोयीसाठी अतिरिक्त तिकीट खिडक्या, प्रमुख स्थानकांवर प्रतीक्षा कक्ष, पिण्याचं पाणी, खाद्यपदार्थ, शौचालयांची सुविधा तसंच रांग व्यवस्थापन आणि सुरक्षेच्यादृष्टीनंही सोयी सुविधांचं नियोजन केलं असल्याचंही रेल्वेनं कळवलं आहे.

**<><><><><>**

व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात प्रति सिलिंडर सुमारे १० रुपये वाढ झाली आहे. मात्र घरगुती वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात बदल झालेला नाही. मुंबईत आता व्यावसायिक वापरासाठीचा सिलेंडर २ हजार ७०१ रुपयांना उपलब्ध आहे.

**<><><><><>**

मुंबई महानगर परिसरात आजपासून ऑटोरिक्षा आणि टॅक्सीच्या भाड्यात वाढ झाली आहे. आता पहिल्या दीड किलोमीटर अंतरासाठी ऑटोरिक्षाचं भाडं किमान २७ रुपये तर टॅक्सीचं भाडं किमान ३३ रुपये झालं आहे.

मुंबई महानगर परिसरात पीएनजी आणि सीएनजीचे दरही वाढले आहेत. सीएनजीच्या दरात किलोमागे २ रुपये वाढ झाली असून तो ८८ रुपये दराने उपलब्ध आहे. घरगुती वापराचा पीएनजी किलोमागे एका रुपयांनं महागला आहे.

**<><><><><>**

ऑगस्ट महिन्यात वस्तू आणि सेवा कराच्या एकूण संकलनात १४ पूर्णांक ८ दशांश टक्क्याची वाढ झाली असल्याची माहिती केंद्रीय अर्थ मंत्रालयानं दिली आहे. एकूण महसूल सुमारे २ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. देशांतर्गत व्यवहारांमधून मिळणारा वस्तू आणि सेवा कर महसूलही ९ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांनी वाढून १ लाख ३७ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला असल्याचं, तर आयातीमधून मिळणारा महसूल २९ टक्क्यांनं वाढून ६२ हजार ६०४ कोटी रुपये झाला असल्याचं मंत्रालयानं कळवलं आहे.

ऑगस्ट महिन्यात केंद्रीय वस्तू आणि सेवा कराचं संकलन ३८ हजार ४१३ कोटी रुपये, तर राज्य वस्तू आणि सेवा कराअंतर्गतचं संकलन ४६ हजार ३१६ कोटी रुपये आणि एकात्मिक वस्तू आणि सेवा कराअंतर्गतचं संकलन १ लाख १५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होतं.

ऑगस्ट महिन्यातल्या कर परताव्याच्या रकमेतही ६८ टक्क्यांनं वाढ होऊन ३१ हजार ७९५ कोटी रुपये झाल्याचंही मंत्रालयानं कळवलं आहे.

तर ऑगस्ट महिन्यात वस्तू आणि सेवाकराअंतर्गत निव्वळ संकलनात वार्षिक तत्वावर ८ पूर्णांक ३ दशांश टक्क्याची वाढ होऊन ते १ लाख ६८ हजार कोटी रुपये झालं असल्याचंही मंत्रालयानं कळवलं आहे.

<><><><>

प्राप्तिकराअंतर्गत देशात २०२६-२७ या करनिर्धारण वर्षासाठी प्राप्तिकर विवरणपत्र भरणाऱ्यांची संख्या विक्रमी पातळीवर पोहोचली असल्याचं प्राप्तिकर विभागानं कळवलं आहे. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत ७ कोटी ८० लाखापेक्षा जास्त विवरणपत्र दाखल झाली असल्याची माहिती विभागानं दिली आहे. गेल्या वर्षी १६ सप्टेंबर या अखेरच्या दिवसापर्यंत ७ कोटी ३० लाखापेक्षा जास्त विवरणपत्रं दाखल झाली होती.

करदात्यांनी वेळेच्या नियमांचं पालन केल्याबद्दल प्राप्तीकर विभागानं आभार मानले आहेत.

<><><><>

यंदा मे आणि जुलै महिन्यात यूपीआय व्यवहारांनी २९ लाख ९० हजार कोटी रुपयांच्या व्यवहाराचा उच्चांक गाठला. ऑगस्ट महिन्यात यूपीआय व्यवहारांची संख्या २४ अब्ज ५१ कोटींच्या विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. ही संख्या जून महिन्यात २२ अब्ज ७२ कोटी इतकी होती. रक्षाबंधनासारख्या सणांमुळे ऑगस्ट महिन्यात ही वाढ झाल्याचं संबंधित तज्ज्ञांचं मत आहे.

<><><><>

महाराष्ट्र आणि कर्नाटकातल्या सीमावाद प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात तातडीनं सुनावणी घेतली जावी अशी मागणी महाराष्ट्रानं आज केली. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेवर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. या प्रकरणातल्या कागदपत्रांची पूर्तता पूर्ण झाली असून आता त्यावर सुनावणी घेतली जावी अशी विनंती महाराष्ट्राच्या वकीलांनी केली. या प्रकरणाची आपण तपासणी करू, मात्र सुनावणीची निश्चित तारीख देऊ शकत नाही, असं न्यायालयानं यावेळी सांगितलं.

<><><><>

देशात झपाट्यानं होत असलेल्या नागरीकरणातून निर्माण होणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी अखिल भारतीय स्थानिक संस्थेनं भविष्यातल्या नागरी प्रशासन क्षेत्रातलं उत्कृष्टता केंद्र म्हणून विकसित होण्याचं उद्दिष्ट ठेवावं, असं आवाहन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज केलं. या संस्थेच्या पदवीदान समारंभात ते आज मुंबईत बोलत होते. निवडून आलेले लोकप्रतिनिधी आणि नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी अल्पकालीन कौशल्यवृद्धी कार्यक्रम विकसित करावे, असंही त्यांनी सुचवलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक पदाच्या पेपर फुटी प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं नवी मुंबईत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयाबाहेर आंदोलन केलं. आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा ही आंदोलकांची मागणी आहे. आमदार रोहित पवार यांच्यासह विद्यार्थी मोठ्या प्रमाणात या आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलकांनी यावेळी आयोगांच्या सचिवांचीही भेट घेतली.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आज पहाटे एक मासेमारी बोट उलटून दोघांचा मृत्यू झाला, तर एकाला वाचवण्यात यश आलं. सिंधुदुर्ग किल्ल्यामागच्या खडकाळ समुद्रात गेलेली ही बोट आज सकाळी ७च्या सुमाराला मोठ्या लाटेच्या तडाख्यामुळे उलटली.

**<><><><><>**

आकाशवाणीची एफएम गोल्ड वाहिनी आज २५वा वर्धापन दिन साजरा करत आहे. १ सप्टेंबर २००१ या दिवशी ही वाहिनी सुरु झाली होती. ज्ञान माहिती आणि मनोरंजन या त्रिसूत्रीवर आधारित ही वाहिनी आजही श्रोत्यांना सेवा देत आहे.

//<><><><><>//